स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जा.क्र.कबचौउमवि/१६/ईमेल/२०२४ दिनांक :- २४ फेब्रुवारी २०२४

जळगाव दि. २४ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे आयोजित पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ क्रिकेट (पुरुष) स्पर्धेच्या सातव्या दिवशी सकाळच्या सत्रात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, सौराष्ट्र विद्यापीठ, राजकोट, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि भगवान महावीर विद्यापीठ गुजराथ अहमदाबाद या चार संघांनी विजय प्राप्त केला.

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजच्या वतीने पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ क्रिकेट स्पर्धा सुरू आहेत. स्पर्धेच्या सातव्या दिवशी सकाळ सत्रात अ गटातील सामना महेंद्र कोठारी मैदानावर नवरचना विद्यापीठ, वडोदरा विरूध्द संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांच्यात झाला. नवरचना विद्यापीठ संघाने १५ षटकात सर्व बाद ७६ धावा केल्या. प्रत्युत्तरात अमरावती विद्यापीठ संघाने ९ षटकात ७७ धावा करून ६ गडी राखुन लक्ष्य प्राप्त केले व विजय नोंदविला. अमरावतीचा सिध्दांत मुळे याने ४४ धावा केल्या व १ बळी घेऊन सामनावीर ठरला.

अ गटातील दुसरा सामना सौराष्ट्र विद्यापीठ राजकोट आणि महाराजा सयाजीराव विद्यापीठ वडोदरा यांच्यात झाला. सौराष्ट्र विद्यापीठाने २० षटकात ९ बाद १५२ धावा केल्या. प्रत्युत्तरात वडोदरा विद्यापीठ संघ १९.२ षटकात १२० धावा काढुन बाद झाला. सौराष्ट्र विद्यापीठाने ३२ धावांनी सामना जिंकला. अभिषेक निमावत हा सौराष्ट्रच्या खेळाडूच्या सामनावीर ठरला. त्याने २२ धावा केल्या आणि २ गडी बाद केले.

ब गटातील सामना भगवान महावीर विद्यापीठ गुजराथ यांच्या विरूध्द आत्मिय विद्यापीठ राजकोट यांच्यात झाला. मु.जे.महाविद्यालयाच्या एकलव्य क्रीडांगणावर झालेल्या या सामन्यात भगवान महावीर विद्यापीठ गुजराथच्या संघाने १८ षटकात सर्वबाद १३५ धावा केल्या तर आत्मिय

विद्यापीठ संघाने १८ षटकात ७ गडी बाद ११० धावा केल्याने पराभुत झाला. भगवान महावीर विद्यापीठाचा ध्रुव मावानी याने भेदक गोलंदाजी करीत ४ गडी बाद केले व तो सामनावीर ठरला.

क गटातील सामना अनुभुती शाळेच्या मैदानावर मुंबई विद्यापीठ विरूध्द डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्यात झाला. मुंबई विद्यापीठ संघ १२९ धावा करू शकला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संघाने ४ गडी गमावुन १९.४ षटकात १३२ धावा करीत विजय मिळविला. सचिन धस याने ४५ धावा आणि 1 गडी बाद केला आणि तो सामनावीर ठरला.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी